भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम, १९९०

(१९९० चा अधिनियम क्रमांक २०)

[२ मे १९९७ रोजी यथाविद्यमान]

# The National Commission for Women Act, 1990

**(Act No. 20 of 1990)**

[*As in force on the 2nd May 1997*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९९

[किंमत : रु. १२]

## प्रावकथन

या आवृत्तीत, दिनांक २ मे १९९७ रोजी यथाविद्यमान असलेला दि नॅशनल कमिशन फॉर वुमेन ॲक्ट, १९९० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ८, अंक १, दिनांक २२ ऑक्टोबर, १९९७ यात पृष्ठ ४६ ते ५० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक २२ ऑक्टोबर १९९७.

डॉ. रघबीर सिंग,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the National Commission for women Act, 1990, as on the 2nd May 1997, contains the authoritative text of that Act in Marathiw hich was published in Gazette of India, Extra ordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 8, dated 22nd October 1997 on pages 46 to 50.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Dated 22nd October 1997.

DR. RAGHBIR SINGH,
Secretary to the Government of India.

# राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम, १९९०

## कलमांचा क्रम

कलमे

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

### प्रकरण दोन

### राष्ट्रीय महिला आयोग

३. राष्ट्रीय महिला आयोगाची घटना.

४. अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी आणि सेवाशर्ती.

५. आयोगाचे अधिकारी व अन्य कर्मचारी.

६. वेतन व भत्ते अनुदानातून देणे.

७. रिक्त पदे इत्यादीमुळे आयोगाच्या कार्यवाही विधिबाह्य ठरणार नाहीत.

८. आयोगाच्या समित्या.

९. आयोगाने कार्यपद्धतीचे विनियमन करणे.

### प्रकरण तीन

१०. आयोगाची कार्ये.

### प्रकरण चार

### वित्त व्यवस्था—लेख व लेखापरीक्षा

११. केंद्र सरकारकडून अनुदाने.

१२. लेखे व लेखापरीक्षा.

१३. वार्षिक अहवाल.

१४. वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षा अहवाल संसदेसमोर मांडणे.

### प्रकरण पाच

### संकीर्ण

१५. आयोगाचा अध्यक्ष, सदस्य व कर्मचारी वर्ग लोकसेवक असणे.

१६. केंद्र सरकारने आयोगाचा सल्ला घेणे.

१७. नियम करण्याची शक्ती.

एच-४४३९-२(१०३९-९-९९)

# राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम, १९९०

(१९९० चा अधिनियम क्र. २०)

(२ मे, १९९७ रोजी यथाविद्यमान)

[३० ऑगस्ट १९९०]

महिलांसाठी एक राष्ट्रीय आयोग घटित करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा त्याला आनुषंगिक अशा बाबींसाठी उपबंध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय प्रजासत्ताकाच्या एकेचाळीसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम, १९९० असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) जम्मू वा काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

(३) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा दिनांकास तो अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "आयोग" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेला राष्ट्रीय महिला आयोग असा आहे;

(ख) "सदस्य" याचा अर्थ, आयोगाचा सदस्य असा असून त्यामध्ये सदस्य सचिवाचा समावेश होतो;

(ग) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित असा आहे.

### प्रकरण दोन

### राष्ट्रीय महिला आयोग

३. (१) या अधिनियमान्वये प्रदान करण्यात येतील त्या शक्तींचा वापर करण्यासाठी आणि नेमून देण्यात येतील ती कार्ये पार पाडण्यासाठी, केंद्र शासन, राष्ट्रीय महिला आयोग म्हणून ओळखला जाणारा निकाय घटित करील. राष्ट्रीय महिला आयोगाची घटना.

(२) आयोग खालील व्यक्तींचा बनलेला असेल—

(क) महिलांच्या हितरक्षणास बांधील असणारा, केंद्र शासनाकडून नामनिर्देशित करण्यात यावयाचा अध्यक्ष;

(ख) महिलांची संभाव्य सेवायोजन क्षमता वाढवण्यात कटिबद्ध असलेला, उद्योग किंवा संघटना यांच्या संबंधातील कायदा किंवा विधि विधान, व्यवसाय संघवाद, महिला स्वेच्छा संघटना (महिला सक्रिय कार्यकर्त्यांसह) यांचे व्यवस्थापन, प्रशासन, आर्थिक विकास, आरोग्य, शिक्षण किंवा समाजकल्याण यांच्याबद्दलचा अनुभव व क्षमता, सचोटी व प्रतिष्ठा असलेल्या व्यक्तींमधून, केंद्र शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील असे पाच सदस्य :

परंतु, प्रत्येकी किमान एक सदस्य अनुक्रमे अनुसूचित जातीतील व अनुसूचित जनजातीतील असेल;

(ग) केंद्र शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येईल असा सदस्य-सचिव, जो—

(एक) व्यवस्थापन, संघटनात्मक संरचना किंवा सामाजिक चळवळ या क्षेत्रातील तज्ञ असेल, किंवा

(दोन) संघाच्या नागरी सेवेचा किंवा अखिल भारतीय नागरी सेवेचा सदस्य असेल असा अथवा उचित अनुभव असणारा असा, संघाचे नागरी पद धारण करणारा अधिकारी असेल.

४. (१) केंद्र शासनाकडून या संबंधात विनिर्दिष्ट करण्यात येईल, त्यानुसार अध्यक्ष आणि प्रत्येक सदस्य तीन वर्षांहून अधिक नसेल अशा कालावधीपुरते पद धारण करील. अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी आणि सेवाशर्ती.

(२) अध्यक्षाला किंवा सदस्याला (संघाच्या नागरी सेवेचा किंवा अखिल भारतीय नागरी सेवेचा सदस्य असलेला किंवा संघात नागरी पद धारण करणारा सदस्य-सचिव खेरीजकरून) लेखी आणि केंद्र शासनाला उद्देशून, अध्यक्षपदाचा, किंवा प्रकरणपरत्वे, सदस्यत्वाचा कोणत्याहीवेळी राजीनामा देता येईल.

(३) केंद्र शासनाला, एखाद्या व्यक्तीला, पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या अध्यक्षपदावरून किंवा सदस्य पदावरून, ती व्यक्ती जर—

(क) अविमुक्त नादार व्यक्ती असेल;

(ख) केंद्र शासनाच्या मते नैतिक अध:पात ठरत असेल अशा अपराधांसाठी सिद्धदोष ठरली असेल आणि तिला कारावासाची शिक्षा झाली असेल;

(ग) विकलमनस्क होऊन सक्षम न्यायालयाकडून तसे घोषित झाले असेल;

(घ) काम करण्याचे नाकारत असेल किंवा काम करण्यास असमर्थ झाली असेल;

(ङ) आयोगाकडून अनुपस्थिती रजा घेतलेली नसताही आयोगाच्या तीन लागोपाठच्या बैठकींना अनुपस्थित असेल;

किंवा

(च) केंद्र शासनाच्या मते तिने अध्यक्षांच्या किंवा सदस्याच्या पदाचा अशा तऱ्हेने गैरवापर केला असेल की, त्या व्यक्तीने त्या पदावर असण्याचे चालू राहणे हे लोकहिताच्या दृष्टीने अहितकारक असेल तर,

तिला पदावरून दूर करता येईल :

परंतु, या बाबतीत कोणत्याही व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेण्याची तिला वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, तिला पदावरून दूर केले जाणार नाही.

(४) पोटकलम (२) अन्वये किंवा अन्यथा रिक्त झालेले पद नवीन नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येईल.

(५) अध्यक्ष व सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि सेवेच्या अन्य अटी व शर्ती विहित करण्यात येतील त्यानुसार असतील.

**आयोगाचे अधिकारी व अन्य कर्मचारी.** ५. (१) केंद्र शासन आयोगाची या अधिनियमाखालील कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील असे अधिकारी व कर्मचारी आयोगाला पुरवील.

(२) आयोगाच्या प्रयोजनासाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन व इतर भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती विहित करण्यात येतील, त्यानुसार असतील.

**वेतन व भत्ते अनुदानातून देणे.** ६. अध्यक्ष व सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि कलम ५ मध्ये उल्लेखिलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते यांसह प्रशासनिक खर्च कलम ११ च्या पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या अनुदानातून देण्यात येतील.

**रिक्तपदे इत्यादीमुळे आयोगाच्या कार्यवाही विधिबाह्य ठरणार नाहीत.** ७. आयोगाच्या घटनेत असलेले कोणतेही पद रिक्त आहे किंवा त्यात कोणतीही उणीव आहे याच केवळ कारणावरून आयोगाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही प्रश्नास्पद किंवा विधिबाह्य ठरणार नाही.

**आयोगाच्या समित्या.** ८. (१) आयोगाकडून वेळोवेळी हाती घ्यावयाच्या अशा विशेष मुद्यांच्या बाबतीत कार्यवाही करण्यासाठी आयोगाला आवश्यक वाटतील अशा समित्यांची नियुक्ती करता येईल.

(२) आयोगाला, आयोगाचे सदस्य नसतील अशा, त्याला योग्य वाटतील तितक्या व्यक्तींना पोटकलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही समितीचे सदस्य म्हणून स्वीकृत करून घेण्याची शक्ती असेल आणि अशा स्वीकृत करून घेण्यात आलेल्या व्यक्तींना समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्याचा आणि त्यांच्या कामकाजात भाग घेण्याचा अधिकार असेल, पण मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

(३) अशा तऱ्हेने स्वीकृत करून घेण्यात आलेल्या व्यक्ती, समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी विहित करण्यात आले असतील असे भत्ते मिळण्यास हक्कदार असतील.

९. (१) आयोगाची किंवा त्याच्या समितीची आवश्यक असेल तेव्हा बैठक घेण्यात येईल आणि अध्यक्षास योग्य वाटेल अशा वेळी व अशा ठिकाणी ती बैठक घेण्यात येईल.

(२) आयोग स्वत: आपल्या कार्यपद्धतीचे आणि त्यांच्या समित्यांच्या कार्यपद्धतीचे विनियमन करील.

(३) आयोगाच्या सर्व आदेशांचे व निर्णयांचे अधिप्रमाणन सदस्य-सचिवाकडून किंवा सदस्य-सचिवाने त्या बाबतीतकृत केलेल्या आयोगाच्या अन्य एखाद्या अधिकाऱ्यांकडून केले जाईल.

## प्रकरण तीन

## आयोगाची कार्ये

१०. (१) आयोग पुढीलपैकी सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडील ती अशी :—

(क) महिलांना संविधानाद्वारे किंवा इतर कायद्याद्वारे तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजनांच्या संबंधातील सर्व बाबींचे अन्वेषण व तपासणी करणे; आयोगाची कार्ये.

(ख) त्या संरक्षक उपाययोजनांच्या कार्यान्वियनाबाबतचे अहवाल केंद्र शासनाला, दरवर्षी आणि आयोगास योग्य वाटेल अशा अन्य वेळीही सादर करणे;

(ग) महिलांची स्थिती सुधारण्यासाठी अशा संरक्षक उपाययोजनांचे केंद्र शासनाकडून किंवा कोणत्याही राज्य शासनाकडून परिणामकारक कार्यान्वियन व्हावे, म्हणून अशा अहवालात शिफारशी करणे;

(घ) महिलांवर परिणाम करणाऱ्या, संविधानातील व इतर कायद्यांतील विद्यमान उपबंधांचे वेळोवेळी पुनर्विलोकन करणे व अशा विधिविधानातील उणीवा, अपुरेपणा व त्रुटी दूर करण्यासाठी सुधारात्मक वैधानिक उपाय सुचविण्याच्या दृष्टीने त्यात विशोधने करण्याबाबत शिफारस करणे;

(ङ) महिलासंबंधीने संविधानातील आणि इतर कायद्यांमधील उपबंध यांचा भंग झाल्याची प्रकरणे उचित प्राधिकरणासमोर नेणे;

(च) पुढील बाबीसंबंधातील तक्रारींमध्ये लक्ष घालणे आणि त्यांची स्वतःहून दखल घेणे :—

(एक) महिलांना त्यांच्या अधिकारांपासून वंचित करणे;

(दोन) महिलांना संरक्षण देण्यासाठी, तसेच समतेचे व विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अधिनियमित केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी न करणे;

(तीन) महिलांच्या हालअपेष्टा कमी करण्याची व त्यांचे कल्याण सुनिश्चित करण्याचे आणि त्यांना सहाय्य मिळवून देण्याचे उद्दिष्ट असलेले धोरणात्मक निर्णय, मार्गदर्शक तत्त्वे किंवा सूचना यांचे अनुपालन न करणे आणि अशा प्रकरणातून निर्माण होणाऱ्या समस्या उचित प्राधिकरणासमोर नेणे;

(छ) महिलांबाबतचे भेदभाव व त्यांच्यावरील अत्याचार यांमधून उद्भवणाऱ्या विशिष्ट समस्यांचा किंवा परिस्थितीचा विशेष अभ्यास किंवा अन्वेषण करण्याची मागणी करणे आणि अडचणींचा शोध घेणे, जेणेकरून त्या दूर करण्यासाठी (कार्ययोजना) सुचविता येईल;

(ज) महिलांना सर्व क्षेत्रांमध्ये योग्य ते प्रतिनिधित्व मिळाले, हे सुनिश्चित करण्यासाठी उपाय सुचविण्याकरिता प्रवर्धनात्मक व शैक्षणिक संशोधनाचे कार्य हाती घेणे आणि महिलांच्या उन्नतीच्या आड येणाऱ्या घटकांचा, उदाहरणार्थ, निवास व मूलभूत सेवा यांचा अभाव असणे, काबाडकष्ट आणि व्यवसायातून उद्भवणारे आरोग्यविषयक धोके कमी व्हावेत म्हणून असणाऱ्या सहाय्यभूत सेवा व तंत्रज्ञान अपुरे असणे यांचा आणि त्यांची उत्पादन क्षमता वाढण्यास कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचाही शोध घेणे;

(झ) महिलांच्या सामाजिक आर्थिक विकासाच्या नियोजन प्रक्रियेत सहभागी होणे व त्यावर सल्ला देणे;

(ञ) केंद्र शासनाच्या व कोणत्याही राज्य शासनाच्या अखत्यारीतील महिला विकासाच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे;

(ट) जेथे महिलांना कैदी म्हणून किंवा अन्यथा ठेवण्यात येते असे तुरुंग, सुधारगृह, महिला संस्था किंवा अभिरक्षेची इतर ठिकाणे यांचे निरीक्षण करणे किंवा निरीक्षण करवणे आणि आवश्यक वाटल्यास, सुधारात्मक कारवाईसाठी संबंधित प्राधिकरणांकडे ती बाब नेणे;

(ठ) बहुतांश महिला वर्गावर परिणाम होणाऱ्या प्रश्नांचा अंतर्भाव असणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांकरिता निधी पुरविणे;

(ड) महिलांशी संबंधित कोणत्याही बाबीविषयी आणि विशेषकरून, महिलांना ज्यामुळे त्रास होतो अशा विविध अडचणींविषयी शासनाकडे नियतकालिक अहवाल सादर करणे;

(ढ) केंद्र शासनाकडून त्यांच्याकडे निर्देशित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब;

(२) केंद्र शासन, पोटकलम (१) च्या खंड (ख) मध्ये निर्देशिलेले सर्व अहवाल, केंद्र शासनाशी संबंधित शिफारशींवर केलेली किंवा करावयाचे प्रस्तावित केलेली कारवाई आणि अशा शिफारशींपैकी एखादी अस्वीकृत केली असेल तर त्याची कारणे, या गोष्टी स्पष्ट करणाऱ्या ज्ञापनासह संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.

(३) जेव्हा असा अहवाल किंवा त्याचा कोणताही भाग, एखाद्या राज्य शासनाचा संबंध असलेल्या अशा एखाद्या बाबी संबंधातील असेल, तेव्हा आयोग अशा अहवालाची किंवा भागाची एक प्रत त्या राज्य शासनाकडे पाठवील आणि ते शासन राज्य शासनाची संबंधित शिफारशींवर केलेली किंवा करण्याचे प्रस्तावित केलेली कारवाई आणि अशा शिफारशींपैकी एखादी अस्वीकृत केली असेल तर स्वीकृतीची कारणे या गोष्टी स्पष्ट करण्याच्या ज्ञापनासह राज्य विधान मंडळासमोर मांडण्याची व्यवस्था करील.

(४) पोटकलम (१) चा खंड (क्) किंवा खंड (च्) चा उपखंड (एक) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही बाबी संबंधात अन्वेषण करताना, आयोगाला खटल्याची संपरीक्षा करणाऱ्या दिवाणी न्यायालयाला असतात त्या सर्व शक्ती आणि विशेषतः पुढील बाबींच्या संबंधातील शक्ती असतील :—

(क्) भारताच्या कोणत्याही भागातील व्यक्तीला उपस्थित राहण्यासाठी समन्स पाठवणे व उपस्थित राहण्यास भाग पाडणे त्याची शपथेवर तपासणी घेणे,

(ख्) कोणत्याही दस्तऐवजाचे प्रकटीकरण करून ते सादर करण्यास फर्माविणे,

(ग्) शपथपत्रावर पुरावा स्वीकारणे,

(घ्) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणत्याही शासकीय अभिलेखाची किंवा त्याच्या प्रतीची मागणी करणे,

(ङ) साक्षीदारांची व दस्ताऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढणे, आणि

(च्) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

## प्रकरण चार

## वित्त व्यवस्था लेखे व लेखापरीक्षा

केंद्र शासनाकडून अनुदाने. ११. (१) केंद्र शासन, संसदेकडून त्या संबंधात कायद्याद्वारे रीतसर विनियोजन करण्यात आल्यानंतर आयोगाला, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ उपयोग करण्यासाठी केंद्र शासनाला योग्य वाटेल तेवढी रक्कम अनुदानाच्या स्वरुपात देईल.

(२) आयोग, या अधिनियमाखालील कार्ये पार पाडण्यासाठी त्यास योग्य वाटेल तेवढी रक्कम खर्च करील आणि अशी रक्कम पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या अनुदानातुन देय असणारा खर्च म्हणून मानण्यात येईल.

लेखे व लेखापरीक्षा १२. (१) आयोग, योग्य ते लेखे आणि इतर संबंधित अभिलेख ठेवील आणि केंद्र शासन, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून विहित करील अशा नमुन्यात, लेख्याचे वार्षिक विवरण तयार करील.

(२) आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा, नियंत्रक व महालेखापरीक्षककाकडून, तो विनिर्दिष्ट करील अशा ठराविक कालांतराने करण्यात यईल आणि अशा लेखापरीक्षेसंबंधात कोणताही खर्च करावा लागल्यास तो आयोगाकडून नियंत्रक व महालेखापरिक्षक यांना देय असेल.

(३) नियंत्रक व महालेखापरीक्षक आणि आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासबंधात या अधिनियमान्वये त्याने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती यांना, नियंत्रक व महालेखापरिक्षक याला सर्वसाधारणतः शासकीय लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात जे अधिकार विशेष अधिकार व प्राधिकार असतात, तेच अधिकार, विशेष अधिकार व प्राधिकार अशा लेखापरीक्षेच्या संबंधात आसतील आणि विशेषतः पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके आणि इतर दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्याची मागणी करण्याचा व आयोगाच्या कोणत्याही कार्यालयाचे निरीक्षण करण्याचा अधिकार असेल.

(४) नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा त्याने या संदर्भात नियुक्त केलेली अन्य कोणतीही व्यक्ती यांनी प्रमाणित केल्याप्रमाणेच, आयोगाचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह दरवर्षी आयोगाकडून केंद्र शासनाकडे पाठविण्यात येतील.

वार्षिक अहवाल. १३. आयोग प्रत्येक, वित्तीय वर्षासाठी विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशावेळी, आपला वार्षिक अहवाल तयार व त्यात मागील वित्तीय वर्षातील त्याच्या कार्याचा संपूर्ण तपशील देईल व त्याची एक प्रत केंद्र शासनाकडे पाठवील.

वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षा अहवाल संसदेसमोर मांडणे. १४. केंद्र शासन, वार्षिक अहवाल व त्यात अंतर्भूत असलेल्या शिफारशी जेथवर केंद्र शासनाची संबंधित असतील तेथवर, त्या शिफारशींवर करण्यात आलेल्या कारवाईचे ज्ञापन आणि अशा शिफारशींपैकी कोणतीही शिफारस अस्वीकृत केली असल्यास त्याची कारणे आणि लेखापरीक्षा अहवाल, ते मिळाल्यावर शक्य तेवढ्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण पाच

### संकीर्ण

१५. आयोगाचा अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व इतर कर्मचारी वर्ग हा भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. — आयोगाचा अध्यक्ष, सदस्य व कर्मचारी वर्ग लोकसेवक असणे.

१६. महिलांवर परिणाम करणाऱ्या सर्व प्रमुख धोरणात्मक बाबींवर केंद्र शासन आयोगाचा सल्ला घेईल. — केंद्र शासनाने आयोगाचा सल्ला घेणे.

१७. (१) केंद्र शासन, अधिनियमांचे उपबंध अंमलात आणण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचना प्रसिद्ध करून नियम करील. — नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेस बाधा न आणता अशा नियमांत पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील :—

(क) अध्यक्ष व सदस्य यांच्याबाबतीत कलम ४ च्या पोटकलम (५) अन्वये व अधिकारी व कर्मचारी यांच्याबाबतीत कलम ५, पोटकलम (२) अन्वये देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती,

(ख) कलम ८, पोटकलम (३) अन्वये स्वीकृत व्यक्तींना समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी भत्ते,

(ग) कलम १०, पोटकलम (४) च्या खंड (च) खालील इतर बाबी,

(घ) कलम १२ च्या पोटकलम (१) अन्वये ठेवावयाचे वार्षिक लेखा विवरणपत्र ज्या नमुन्यात ठेवावयाचे तो नमुना,

(ङ) कलम १३ खालील वार्षिक अहवाल ज्या नमुन्यात ठेवावयाचे तो नमुना व तो अहवाल जेव्हा सादर करावयाचा ती वेळ,

(च) विहित करणे आवश्यक असलेल्या किंवा विहित करता येतील अशा इतर कोणत्याही बाबी.

(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते, एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता, सत्रासीन असताना, ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्रांच्या किंवा क्रमवर्ती सत्राच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये, याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रुपातच परिणामक होईल, किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई